लोकमत

# उल्कावर्षाव पाहण्याची आज संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मिथुन राशीतून ४ ते १७ डिसेंबरदरम्यान उल्कावर्षाव होत आहे. आज, शनिवारी रात्री सर्वांत मोठा व नेत्रदीपक असा उल्कावर्षाव पाहण्याची संधी आहे.

मध्यरात्री दोन वाजता साधारणत: १०० ते १२० एवढ्या उल्कांचा वर्षाव मिथुन राशीतून होण्याची शक्यता आहे. हा उल्कावर्षाव पाहण्यासाठी कोणत्याही उपकरणांची आवश्यकता नाही. उल्कावर्षाव पाहण्यासाठी शहरातील कृत्रिम प्रकाशापासून दूर व उंच ठिकाण निवडावे. उंच इमारतीच्या छतावरून आकाश नकाशाच्या साहाय्याने मिथुन राशी ओळखून त्या दिशेने निरीक्षण करीत राहावे. साधारणत: मिनिटाला एक ते दोन उल्का पडताना दिसतील. सूर्य मावळल्यापासून ते पहाटे ४.३० पर्यंत मिथुन राशीतून होणारा उल्कावर्षाव पाहता येईल, अशी माहिती डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.


लोकमत

## विनय हर्डीकर : शिवाजी विद्यापीठात हमीद दलवाईंच्या कार्यावर दोनदिवसीय चर्चासत्र

# दलवाईंच्या निधर्मी विचारांच्या पुनरुज्जीवनाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नागरिकत्व पडताळणी, रामजन्मभूमी खटला, गोवंश, काश्मीरमधील कलम ३७० या देश ढवळून काढणाऱ्या घटना घडत असताना, निधर्मीवादाचे खंदे पुरस्कर्ते असलेल्या हमीद दलवाई यांची उणीव प्रकर्षाने जाणवत आहे. आजच्या या संकटकाळात त्यांच्या निधर्मी विचारांच्या पुनरुज्जीवनाची गरज आहे, अशी मांडणी ज्येष्ठ पत्रकार व अभ्यासक विनय हर्डीकर यांनी केली. धर्मनिरपेक्षतेच्या आधाराने समाजसुधारणेसाठी दलवाई यांनी मांडलेले विचार केवळ मुस्लिमच नव्हे तर हिंदुधर्मीयांनाही लागू पडतात. त्यांचे हे विचार विद्यापीठातील चर्चासत्राच्या सीमारेषा ओलांडून बाहेर नेले पाहिजेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली.



शिवाजी विद्यापीठातील भाषा भवनमध्ये शुक्रवारी 'हमीद दलवाई यांचे साहित्य व समाजकार्य' या विषयावर आयोजित चर्चासत्रात विनय हर्डीकर यांनी मार्गदर्शन केले.

'हमीद दलवाई यांचे साहित्य आणि समाजकार्य' या विषयावर शिवाजी विद्यापीठात 'भाषा भवन'मध्ये दोनदिवसीय चर्चासत्र आयोजित केले आहे. उद्घाटन शुक्रवारी सकाळी ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता भारती पाटील होत्या. 'साधना' साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ, दलवाई यांच्या कन्या रुबिना चव्हाण, मराठी विभागप्रमुख रणधीर शिंदे, माजी आमदार सुभाष जोशी प्रमुख उपस्थित होते.

### दलवाई अभ्यासक्रमात का नाहीत?

उद्घाटक म्हणून बोलताना राजन गवस म्हणाले, 'अलीकडे पुरोगामी, निधर्मी, धर्मनिरपेक्षता यांची यथेच्छ टिंगल केली जात असताना दलवाईंची प्रकर्षाने आठवण येते. दलवाई आणि सूफी यांचे नाते तपासण्याची गरज आहे. त्यांचे कार्य आणि साहित्य अभ्यासमंडळावर का आले नाही, अशी खंतही व्यक्त केली.

हर्डीकर म्हणाले, 'दलवाई यांनी केवळ मुस्लिम धर्मातील व्यंगांवर बोट ठेवले असे नाही, तर त्यांनी धर्माच्या नावाने जे काही चालते, त्याला विचारानेच आव्हान दिले. हिंदू समाजानेही याच विचाराने सत्यशोधन केले असते तर आज वेगळे चित्र दिसले असते. आज दलवाई असते आणि त्यांनी देशातील धार्मिक, सामाजिक परिस्थिती पाहिली असती तर समाजाच्या भोळेपणाचा गैरफायदा घेऊन राष्ट्रप्रेमाच्या नावाखाली ध्रुवीकरण करण्याचे जे जोरदार प्रयत्न सुरु आहेत, त्यांना वस्तुनिष्ठ चर्चा व टीकेच्या आधारानेच उत्तर दिले असते. प्रतिकापेक्षा प्रत्यक्ष कृतीची आजच्या घडीला गरज असून, प्रतिकवादातून बाहेर पडून खऱ्या धर्माची चिकित्सा करणे हीच दलवाई यांच्या विचारांशी बांधीलकी ठरेल.'

डॉ.भारती पाटील म्हणाल्या,'आज विद्यापीठ व शिक्षण संस्थांमध्ये खुलेपणाने बोलण्यावर मर्यादा येत असताना अशा प्रकारची चर्चासत्रे विचारांना दिशादर्शक ठरणारी आहेत. विद्यापीठाने अशा प्रकारचे चर्चासत्र घेतले, हीच मुळात कौतुकाची बाब आहे.'

'साधना'चे विनोद शिरसाठ म्हणाले, 'दलवाई यांना जाऊन ४३ वर्षे झाली तरी त्यांच्या विचारांचे भारावलेपण गेली चार दशके टिकून आहे; पण ते पुढेही राहावे यासाठी शिक्षणसंस्था, विद्यापीठ, अभ्यासमंडळांनी पुढाकार घेऊन मोठ्या समूहापर्यंत कार्य न्यावे. प्रा.नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. राजेश पाटील यांनी आभार मानले.

# ज्येष्ठ कथाकार सखा कलाल यांचे निधन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मराठी साहित्यातील नामवंत कथाकार सखा कलाल यांचे गुरुवारी रात्री वयाच्या ८१ व्या वर्षी वृद्धापकाळाने कोल्हापुरातील राहत्या घरी निधन झाले. 'सांज', 'ढग' यांसारख्या गाजलेल्या कथासंग्रहांबरोबर त्यांनी अगदी मोजक्या कथा लिहिल्या. दर्जेदार कथांमुळे मराठी साहित्यात त्यांचे नाव आदराने घेतले जात होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुलगी असा परिवार आहे. अंत्यसंस्कार शनिवारी सकाळी ९ वाजता पंचगंगा स्मशानभूमीत करण्यात येणार आहेत.




सखा कलाल यांचा जन्म बेळगाव जिल्ह्यातील रायबाग येथे झाला होता. पुढे ते शिक्षणानिमित्त कोल्हापूरला आले. शिक्षणानंतर त्यांनी काही काळ शिवाजी विद्यापीठात लिपिक म्हणून नोकरी केली. ग्रंथालयशास्त्रातील उच्च शिक्षणानंतर ते देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉमर्स कॉलेजमध्ये ग्रंथपाल म्हणून रुजू झाले आणि तेथून निवृत्त झाले. लेखन, वाचन, चिंतनात रमणारे कलाल साहित्य वर्तुळापासून थोडे बाजूला ▶▶ पान ७ वर

# ज्येष्ठ कथाकार सखा कलाल यांचे निधन

**(पान १ वरून)** राहत असत. कलाल यांची पहिली 'कात' ही कथा १९५९ मध्ये सत्यकथेमध्ये छापून आली. या कथेला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. ग्रामीण संवेदनशीलता, मानवी भावभावनांच्या माध्यमातून निसर्गाची वेगवेगळी रूपे मांडणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. दोन कथासंग्रहांतील २८ कथा आणि काही अप्रकाशित अशा ४० कथा कलाल यांनी लिहिल्या. ते मराठीत अतिशय गंभीरपणे लिहिणारे कथाकार म्हणून ओळखले जात होते. कथांव्यतिरिक्त त्यांचा 'पार्टी' हा ललित लेखसंग्रहही प्रकाशित आहे. १९६० नंतर लिहिणाऱ्या चारुता सागर, महादेव मोरे, आनंद यादव, बाबा पाटील यांच्याबरोबरीचे कलाल हे नामवंत लेखक होते. त्यांच्या कथांमधील निसर्गाची वेगवेगळी रूपे म्हणजे मराठी कथेचा तो काव्यात्म आविष्कार होय. त्यांच्या कथांचे आकाशवाणीवर क्रमशः वाचनही झाले होते.

### साहित्य परंपरेतील महनीय

कोल्हापूरच्या साहित्य परंपरेतील एक अढळ तारा अशी




कलाल यांची ओळख म्हणावी लागेल. चाळीस-पंचेचाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात संख्यात्मकदृष्ट्या मोजक्याच कथांचे लेखन त्यांनी केले. 'ढग' आणि 'सांज' हे त्यांचे दोन कथासंग्रह. या दोन संग्रहांत मिळून फक्त अठ्ठावीस कथा संग्रहित झाल्या. ग्रामीण मानसिकतेचे व जीवन संस्कृतीचे विविधांगी चित्रण, पर्यावरण, कुटुंब संस्कृतीतील बारकावे हे त्यांच्या साहित्याचे वेगळेपण होते. कॉमर्स कॉलेज येथे ग्रंथपाल म्हणून ते कार्यरत होते. तेव्हापासून त्यांचा साहित्य क्षेत्रातील मंडळींशी संपर्क येऊ लागला. बोलण्याच्या ओघात कुणाचेही मन दुखावणार नाही अथवा कुणाच्या प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही याची ते खूप काळजी घ्यायचे.